श्री. भिमाशंकर शशिकांत देशमुख, सेवा निलंबित कनिष्ठ सहाय्यक (लिपीक), प्रा.आ.केंद्र मवेशी ता अकोले यांनी कार्यालयीन कामी गैरवर्तन केलेने विभागीय चौकशी सुरु करणेकामी सादरकर्ता व चौकशी अधिका-याची नेमणुक करणेबाबत.

अहिल्यानगर जिल्हा परिषद
सामान्य प्रशासन विभाग
जिल्हा परिषद आदेश क्रमांक साप्रवि/आस्था-३/१५२१११२/१०८०/२०२५
अहिल्यानगर दिनांक - स्वाक्षरी खाली नमुद केलेप्रमाणे

वाचा:- १. इकडील निलंबन आदेश साप्रवि-१/आस्था-३/४८५/२०२५ दिनांक ०९/०५/२०२५
२. इकडील दोषारोप पत्र जा.क्र.साप्रवि-१/आस्था-३/१५२१११२/४६०/२०२५ दिनांक २१/०६/२०२५
३. श्री देशमुख यांना ज्ञापन दोषारोपपत्र बजावले बाबत पोहोच दि १५/०७/२०२५
४. महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील ६ (५)

श्री. भिमाशंकर शशिकांत देशमुख, सेवा निलंबित कनिष्ठ सहाय्यक (लिपीक) हे प्राथमिक आरोग्य केंद्र मवेशी ता अकोले येथे कार्यरत असताना त्यांनी शासकीय रक्कमेचा अपहार केल्याने संदर्भ क्र. १ अन्वये श्री. देशमुख यांना सेवानिलंबीत करणेत आलेले होते. संदर्भ क्रमांक २ नुसार श्री देशमुख यांना ज्ञापन/ दोषारोपपत्र बजावणेत आले. संदर्भ क्र. ३ अन्वये श्री देशमुख यांना ज्ञापन/ दोषारोपपत्र बजावले बाबत पोहोच कार्यालयास प्राप्त झाली. श्री. भिमाशंकर शशिकांत देशमुख, सेवा निलंबित कनिष्ठ सहाय्यक, यांनी अद्यापार्यंत ज्ञापन दोषारोपपत्राचा खुलासा सादर केलेला नाही.

सबब, श्री. भिमाशंकर शशिकांत देशमुख, सेवा निलंबित कनिष्ठ सहाय्यक, यांचेविरुध्द न्याय हक्काचे दृष्टीने चौकशी करणे आवश्यक असलेने महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम ६ च्या तरतुदींनुसार खातेनिहाय चौकशी करणेचे निश्चित करण्यात आलेले आहे. त्यासाठी सदरची चौकशी करणेकामी चौकशी अधिकारी, तथा सहाय्यक आयुक्त, विभागीय चौकशी (जि.प.कर्मचारी), विभागीय आयुक्त कार्यालय, नाशिक विभाग, नाशिक यांची नियुक्ती करीत आहे. तसेच विभागीय चौकशीस महाराष्ट्र जिल्हा परिषदा जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ च्या नियमातील तरतुदी लागु राहतील.

तसेच महाराष्ट्र जिल्हा परिषद जिल्हा सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ चे नियम ६ (५) अन्वये जिल्हा परिषदेची बाजु मांडणेकरिता सादरकर्ता अधिकारी म्हणुन श्री.शिवराम धोंडु डगळे, कनिष्ठ प्रशासन अधिकारी, पंचायत समिती अकोले यांची नेमणुक करण्यात येत आहे. सादरकर्ता अधिकारी यांनी प्रत्येक चौकशीचे तारखेस हजर रहावे. त्याप्रमाणे संदर्भ क्रं.२ मध्ये नमुद केलेले आक्षेप व पुरावे यांचा सखोल अभ्यास करुन जिल्हा परिषदेची बाजु मांडावी.

..२

परिशिष्ट क्रमांक तीन व चार मध्ये (दोषारोपपत्र) नमुद केलेले साक्षीदार यांना पुराव्याच्या कागदपत्रांसह चौकशीच्या दिवशी हजर ठेवावे. तसेच सोबत प्राथमिक कार्याचा करावयाचा तपशिल जोडला आहे. उक्त नमुद कामी हयगय झाल्यास सादरकर्ता अधिकारी यांना जबाबदार धरण्यात येईल.

सदर आदेश अहिल्यानगर जिल्हा परिषदेच्या www.nagarzp.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असुन त्याचा संकेतांक क्रमांक 202510091040177... असा आहे.

Signed by Anand Subhashlal Bhandari
Date: 09-10-2025 20:44:39

मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर

प्रति,

१. विभागीय चौकशी अधिकारी तथा सहाय्यक आयुक्त, विभागीय चौकशी (जि.प.कर्मचारी), नाशिक विभाग, नाशिक. **सोबत संबंधीत प्रकरणाचे आवश्यक कागदपत्र १ ते** १२६

२. श्री.शिवराम धोंडु डगळे, कनिष्ठ प्रशासन अधिकारी, पंचायत समिती अकोले
**व्दारा व प्रत**- गट विकास अधिकारी, पंचायत समिती अकोले
२/-सदर आदेशाची प्रत श्री.शिवराम धोंडु डगळे, कनिष्ठ प्रशासन अधिकारी, पंचायत समिती अकोले, यांना बजावुन दिनांकित स्वाक्षरीची प्रत या कार्यालयास सादर करावी.
**सोबत संबंधीत प्रकरणाचे आवश्यक कागदपत्र पान क्र.१ ते** १२६

३. श्री. भिमाशंकर शशिकांत देशमुख, सेवा निलंबित कनि सहा, पंचायत समिती कर्जत
व्दारा:- गट विकास अधिकारी, पंचायत समिती कर्जत
२/-सदर आदेशाची प्रत श्री. भिमाशंकर शशिकांत देशमुख, सेवा निलंबित कनिष्ठ सहाय्यक यांना बजावुन दिनांकित स्वाक्षरीची प्रत या कार्यालयास सादर करावी.

स्वाक्षरी/--
(आनंद भंडारी भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अहिल्यानगर